MHPU120005162026

**फौ.कि.अर्ज.नं. ४६/२०२६**
**विशाल वि. सरकार**

**<u>आदेश निशाणी १ वर</u>**

**१.** सदर अर्ज बी.एन.एस.एस.चे कलम ५०३ नुसार, राजगड पोलिस स्टेशन येथील गु.र.नं. २२२/२०२६ यामध्ये जप्त केलेल्या चारचाकी वाहनाचा अंतरिम ताबा मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. सदर चारचाकी वाहनाचा नोंदणी क्रमांक एम.एच. १२ व्ही.क्यु. ८०१८, चासिस नं. MBHCZCB3SPFC62425 इंजिन नं. K12NP1446916 असा असून ते मारुती सुझुकी कंपनीचे स्वीफट व्हीएक्सआय सीएनजी हे चारचाकी वाहन आहे.

**२.** तपास अधिकारी यांचे म्हणण्यानुसार, आरोपी नं. १ याने यापुर्वी असेच गुन्हे केले असुन तो पुन्हा असाच गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन त्यांनी सदरचे वाहन सोडण्यास हरकत घेतली आहे. सहा.सरकारी वकील यांचे म्हणण्यानुसार सदर वाहन गंभीर गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले आहे. अदयपि, गुन्हयाचे तपास काम पुर्ण झालेले नाही. अर्जदार यांना मुद्देमाल परत दिल्यास तो त्याच्या स्वरुपामध्ये बदल करेल व पुन्हा अशाच प्रकारचा गंभीर गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**३.** अर्जदार यांनी दाखल कागदपत्रांसोबत प्रथम खबर अहवालाची प्रत, चारचाकी वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र, वाहनाच्या विम्याची प्रत व ओळखपत्र म्हणून आधार कार्डची प्रत दाखल केलेली आहे. या दाखल कागदपत्रांवरून असे दिसून येते की, अर्जदार हेच या चारचाकीचे मालक आहेत. आजपावेतो जप्त मुद्देमालावर अर्जदार वगळता इतर कोणीही हक्क अथवा अधिकार सांगितलेला नाही.

**४.** माननीय सर्वोच्च न्यायालयाने सुंदरबाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात राज्य (२००२ १० एस.सी.सी. २८३) या खटल्यात खालीलप्रमाणे

निरीक्षण नोंदवले आहे: ''जप्त केलेला मुद्देमाल न्यायालयाच्या किंवा पोलिसांच्या ताब्यात अत्यंत आवश्यक असेल त्यापेक्षा अधिक काळासाठी ठेवु नये.''.

**५.** सदर वाहनाची विक्री अर्जदार करणार नाहीत, तसेच त्याच्या स्वरूपातही बदल करणार नाहीत, याबाबत योग्य त्या अटी व शर्ती लादून खबरदारी बाळगता येईल. परंतु सदर वाहन पोलिस स्टेशनला पडून राहिल्यास त्याचे इंजिन निकामी व खराब होण्याची शक्यता आहे. त्यापेक्षा सदर वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देणे, हेच हितावह आहे. म्हणुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** राजगड पोलिस स्टेशन येथील गु.र.नं. २२२/२०२६ मध्ये जप्त केलेल्या एम.एच. १२ व्ही.क्यु. ८०१८, चासिस नं. MBHCZCB3SPFC62425 इंजिन नं. K12NP1446916 मारुती सुझुकी कंपनीचे स्वीफट व्हीएक्सआय सीएनजी या चारचाकी वाहनाचा अंतरिम ताबा, रक्कम रूपये ५,००,०००/— च्या हमीपत्रावर व सुपुर्तनाम्यावर, खालील अटी व शर्तीनुसार अर्जदार विशाल रघुनाथ खुटवड, रा. हातवे बु., ता. भोर, जि. पुणे यांना देण्यात यावा.

**अ.** अर्जदार यांनी सदर वाहनाची तबदिली अथवा विक्री करण्याची नाही.

**ब.** सदर वाहनाच्या रंगात वा स्वरूपात बदल करण्याचा नाही.

**क.** न्यायालय सांगेल तेव्हा सदर वाहन अर्जदार यांनी न्यायालयात हजर करावयाचे आहे.

**३.** सदर वाहनाचा अंतरिम ताबा देत असतानाच्या प्रक्रियेचा रितसर पंचनामा करण्यात यावा. तपास अधिकारींनी वाहनाचे दोन फोटो काढून घ्यावेत. आणि पंचनामा व सदरचे फोटो तपासाच्या अंतिम अहवालासोबत न्यायालयात पाठवावेत.

**खुल्या न्यायालयात घोषित**

JADHAV MEENA WAMAN Digitally signed by JADHAV MEENA WAMAN Date: 2026.07.03 16:37:32 +0530

**( मीना वामन जाधव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
ता. भोर, पुणे

दिनांक :— ०३/०७/२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : M. D. Shirode, Stenographer (L.G.)

Court Name : Meena Waman Jadhav
Judicial Magistrate First Class, Bhor, Pune

Date of Judgment : 03/07/2026

Judgment signed by presiding officer on : 03/07/2026

Judgment uploaded on : 03/07/2026